Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- II FEBRUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभिक्षेत्रीय अभ्यास- १९५१ ते २०११

प्रा.डी.के.आहिरे
सहाय्यक प्राध्यापक
भूगोल विभाग
कर्म.आबासाहेब तथा ना.म.सोनवणे कला
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सटाणा
ता.बागलाण जि.नाशिक

**प्रस्तावना-**

लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची अगदी अलीकडे विकसित होत असलेली अत्यंत महत्वाची शाखा मानली जाते.या शाखेचे स्वरूप व्यापक असल्यामुळे आज या शाखेकडे स्वतंत्र विषय शाखा म्हणूनच बघितले जाते.लोकसंख्या भूगोलात प्रामुख्याने लोकसंख्या रचना,आकार, वितरण, घनता, वाढ, लिंग गुणोत्तर,साक्षरता इत्यादी घटकांचा अभ्यास केला जातो.11 जुलै 1987 रोजी जगात 5 अब्जावं अपत्य जन्माला आलं. तेव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून जगभर पाळला जातो. 1987 ते 2011 या कालावधीत जागतिक लोकसंख्या 2 अब्जाने वाढली तर 31ऑक्टोबर 2011 रोजी आपली लोकसंख्या 7 अब्ज झाली. लोकसंख्येचे हे आकडे अगदी `ओव्हरफ्लो' होऊन वाहत आहेत. 20व्या शतकात झालेली जागतिक लोकसंख्येतील प्रचंड वाढ ही विशेष क्रांतिकारी घटना होय. 1927 साली जगाची लोकसंख्या 2 अब्ज, होती अवघ्या 30 वर्षात ती झाली 1959 मध्ये 3 अब्ज आणि 39 वर्षात विश्वलोकसंख्या दुप्पट झाली.1987 ते 2011 पर्यंत विश्वलोकसंख्या 2 अब्जाने वाढली. आशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया ह्या पाच खंडामधील देशात सर्वात कमी लोकसंख्या आणि अगदी कमी वेगाने वाढणारी लोकसंख्या आहे ऑस्ट्रेलियाची. जगाच्या एकूण लोकसंख्येत 60 टक्के आशियामध्ये आहे .कारण चीन व भारत हे पहिल्या दोन क्रमांकाचे देश ह्या खंडामध्ये आशियात आहेत. अमेरिकेचे क्षेत्रफळ भारताच्या तिप्पट आहे पण लोकसंख्या मात्र भारताच्या लोकसंख्येच्या 25 टक्के आहे. 21व्या शतकात आशिया हा सर्वात अधिक लोकसंख्येचा खंड असेल. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 1.21 अब्ज झाली आहे. म्हणजे 64 वर्षात भारताची लोकसंख्या तिप्पटीहून अधिक झाली आहे. अंदाजे दोन जनगणनेच्या काळात म्हणजे 10 वर्षात प्रत्येक वर्षी लोकसंख्येत 1.50 ते 1.75 कोटी भर पडत आहे. आपल्या देशात उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, झारखंड, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि ओरिसा ह्या आठ राज्यातील लोकसंख्या वाढ विशेष आहे. ह्या आठ राज्यांची एकूण लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येत जवळजवळ 48 टक्के आहे.

बीजसंज्ञा- लोकसंख्या वाढ,जन्मदर, स्थलांतर, अभिक्षेत्रीय वितरण

**अभ्यास क्षेत्र-**

नाशिक जिल्ह्याचे अक्षवृत्तीय स्थान १९° ३३' ते २०° ५३' उ तर रेखावृत्तीय स्थान ७३°१६' व ७५°१६' पूर्व असून जिल्हयाचे एकूण क्षेत्र १५,५३० चौ.कि.मी. असून क्षेत्राच्या तुलनेत नाशिक जिल्हा महाराष्ट्रत तिस-या क्रमांकावर आहे. हे क्षेत्र राज्य क्षेत्राच्या ५.०४ टक्के आहे. या जिल्हयामध्ये नाशिक, पेठ,दिंडोरी, सुरगाणा, कळवण, बागलाण, मालेगाव, चांदवड, नांदगाव, येवला, निफाड, सिन्नर, इगतपूरी व नव्याने घोषित केलेले देवळा व त्रंबक असे एकूण १५ तालुके आहेत.महाराष्ट्रातील पाच जिल्हे व गुजरात राज्यातील दोन जिल्हये यामध्ये जिल्हयाच्या उत्तर सिमेवर धुळे जिल्हा व ठाणे जिल्हा असून दांग व सुरत हे गुजरात राज्यातील जिल्हे वायव्य दिशेस आहे. जिल्हयाची सरासरी उत्तर दक्षिण लांबी १२० कि.मी. असून पूर्व पश्चिम लांबी २०० कि.मी. आहे.जिल्यात एकूण भौगोलिक क्षेत्राच्या संदर्भात निरनिराळया तालुक्यांना व्यापलेल्या क्षेत्रांचा विचार केला असता १२% क्षेत्र असलेला मालेगाव तालुका सर्वात मोठा तर पेठ तालुक्याचे सर्वात कमी ३.६३% क्षेत्र आहे. देवळा हा दुसरा क्रमांकाचा लहान(३.८१% क्षेत्र ) तालुका आहेत. राहिलेल्या १२ तालुक्यानी प्रत्येकी जवळजवळ ५% ते ९% क्षेत्र व्यापलेले आहे.जिल्हयामध्ये २००१ च्या जनगणनूसार एकूण १९३१ खेडी असून त्यापैकी १,९२७ खेडी, वस्ती असलेली व चार खेडी ओसाड आहेत.


इतर जिल्हयाच्या तुलनेत ओसाड खेडयांची संख्या नगण्य आहे.

**उद्देश-**

१) नाशिक जिल्ह्याची भोगोलिक रचना अभ्यासणे.

२) नाशिक जिल्यातील लोकसंख्येचा काळानुसार झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

३) नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभीक्षेत्रीय अभ्यास करणे.




**माहिती स्रोत व अभ्यासपद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी दुय्यम प्रकारच्या माहितीचा वापर केला आहे.प्रस्तुत शोध निबंधासाठी नाशिकजिल्ह्यातील १९५१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्यावाढीचा अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम माहिती हि प्रामुख्याने नाशिक जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन,नाशिक जिल्ह्याची जनगणना व संदर्भ ग्रंथाचा वापर करून मिळवली आहे.नाशिक जिल्ह्यातील १९५१ ते २०११ याकालावाधीतील लोकसंख्या वाढ काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$\text{लोकसंख्या वृद्धी दर} = \frac{P1 - P0}{P0} \times 100$$

$P_1$- चालू वर्षाची लोकसंख्या

$P_0$- पुढील वर्षाची लोकसंख्या

**विषय विवेचन-**

**नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या -**

१९५१ मध्ये नाशिक जिल्ह्याची एकून लोकसंख्या १४३०००० होती यापैकी सर्वाधिक लोकसंख्या नाशिक तालुक्याची २५४००० होती त्याखालोखाल मालेगाव, निफाड व बागलाण तालुक्याचा क्रमांक होता तर सुरगाणा तालुक्याची सर्वात कमी लोकसंख्या होती. १९६१ नाशिक जिल्ह्याची एकून लोकसंख्या १८५५००० होती त्यापैकी सर्वाधिक नाशिक तालुख्याची (३२७०००) तर सर्वात कमी सुरगाणा तालुक्याची (५८०००) लोकसंख्या होती.१९७१ ते १९९१ या कालावधीत नाशिक जिल्ह्याची एकून लोकसंख्या अनुक्रमे २३६९०००,२९९२०००,व ३८५०००० असल्याचे दिसून येते. या कालावधीत नाशिक तालुक्याची सर्वाधिक लोकसंख्या दिसून येते तर त्याखालोखाल मालेगाव तालुक्याचा क्रमांक लागतो. या कालावधीत सर्वात कमी लोकसंख्या सुरगाणा व पेठ तालुक्याचीअसल्याची दिसून येते. २००१ व २०११ या वर्षात नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक लोकसंख्या वाढल्याची दिसून येते ती अनुक्रमे ४९८८००० व ६१०७१८७ इतकी आढळून येते.या कालावधीत सुद्धा नाशिक तालुक्याची सर्वाधिक तर पेठ तालुक्याची लोकसंख्या सर्वात कमी असल्याचे दिसून येते.

VOL- VII ISSUE- II FEBRUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

| अ.क्र | तालुका | लोकसंख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
| 1 | नाशिक | २५४००० | ३२७००० | ४२५००० | ६२७००० | ८४७००० | १३१७००० | १७५५४९० |
| 2 | पेठ | ५२००० | ६८००० | ८२००० | ९९००० | ७८००० | ९७००० | ११९८३८ |
| 3 | दिंडोरी | ८७००० | ११२००० | १३७००० | १६४००० | २०८००० | २६५००० | ३१५७०९ |
| 4 | सुरगाणा | ४४००० | ५८००० | ७०००० | ८३००० | १०९००० | १४५००० | १७५८०० |
| 5 | कळवण | ७५००० | १००००० | १२४००० | १५६००० | १४०००० | १६६००० | २०८३६२ |
| 6 | बागलाण | १२०००० | १५३००० | १९७००० | २४३००० | २६५००० | ३१२००० | ३७४४०० |
| 7 | मालेगाव | २१०००० | ३१३००० | ४२६००० | ५१७००० | ६५१००० | ७९०००० | १५५५४९० |
| 8 | चांदवड | ७६००० | ९७००० | ११७००० | १३३००० | १६५००० | २०५००० | २३५८९० |
| 9 | नांदगाव | ९५००० | १२१००० | १४६००० | १६९००० | २०३००० | २३७००० | २८८८४८ |
| 10 | येवला | ८८००० | १०३००० | १३७००० | १४८००० | १८८००० | २३५००० | १७११०० |
| 11 | निफाड | १२५००० | १५५००० | २१७००० | २९२००० | ३५७००० | ४३७००० | ४९३२५१ |
| 12 | सिन्नर | १०७००० | १३३००० | १६४००० | १९३००० | २२८००० | २९०००० | ३४६३९० |
| 13 | इगतपुरी | ९६००० | ११३००० | १३७००० | १६७००० | १८८००० | २२८००० | २५३५०० |
| 14 | त्र्येंबकेश्वर | NA | NA | NA | NA | ११३००० | १४०००० | २६८००० |
| 15 | देवला | NA | NA | NA | NA | ११६०००० | १३०००० | १४४५०० |
| नाशिक जिल्हा | | १४३०००० | १८५५००० | २३६९००० | २९९२००० | ३८५०००० | ४९८८००० | ६१०७१८७ |


(माहिती स्रोत - नाशिक जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन,नाशिक जिल्ह्याची जनगणना )

**लोकसंख्या वृद्धीदर –**

१९५१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्या वाढीचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि नाशिक जिल्ह्यात १९५१ ते १९८१ वाढीचा वेग कमी होताना दिसून येतो या कालावधीत नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा सरासरी वेग २८.१०% इतका दिसून येतो.

| अ.क र. | तालुका | लोकसंख्यावाढ | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
| 1 | नाशिक | २८.७४ | २९.९६ | ४७.५२ | ३५.०८ | ५५.४८ | ३३.२९ |
| 2 | पेठ | ३०.७६ | २०.५८ | २०.७३ | -२१.२१ | २४.३५ | २३.५४ |
| 3 | दिंडोरी | ४९.८५ | २२.३२ | १९.७० | २६.८२ | २७.४० | १९.१३ |
| 4 | सुरगाणा | ३१.८१ | २०.६८ | १८.५७ | २१.३२ | ३३.०२ | २१.२४ |
| 5 | कळवण | ३३.३३ | २४.०० | २५.८० | ११.४२ | १८.५७ | २५.५१ |
| 6 | बागलाण | २७.५ | २७.७५ | २३.३५ | ९.०५ | १७.७३ | २०.०० |
| 7 | मालेगाव | ४९.०४ | ३६.१० | २१.३६ | २५.९५ | २१.३५ | १२.२२ |
| 8 | चांदवड | २७.६३ | २०.६१ | १३.६७ | २४.०६ | २४.२४ | १५.०० |
| 9 | नांदगाव | २७.३६ | २०.६६ | १५.७५ | २०.११ | १६.७४ | २१.८७ |
| 10 | येवला | १७.०४ | ३३.०० | ८.०२ | २७.०२ | २५.०० | १५.३६ |
| 11 | निफाड | २४.०० | ४१.६३ | ३४.५६ | २२.२६ | २२.४० | १२.८१ |
| 12 | सिन्नर | २४.९९ | २३.३० | १७.६८ | १८.१३ | २७.१९ | ११.८४ |
| 13 | इगतपुरी | १७.७० | २१.२३ | २१.८९ | १२.६७ | २१.२७ | ११.८४ |
| 14 | त्र्येंबकेश्वर | - | - | - | - | ७.६७ | २०.०० |
| 15 | देवला | - | - | - | | १२.०६ | ११.१५ |
| नाशिक जिल्हा | | २९.७२ | २७.७० | २६.२९ | २८.७० | २९.५१ | २२.४३ |

(**माहिती स्रोत -** नाशिक जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन,नाशिक जिल्ह्याची जनगणना )




तर १९९१ या वर्षी लोकसंख्या वाढीचा वेग २९.५१ इतका वाढलेला दिसून येतो तर २०११ या वर्षात लोकसंख्या वाढीचा वेग ७.०८ % इतका कमी होऊन २२.४३% कमी झालेला दिसून येतो. तालुकानिहाय १९५१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्या वाढीचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि १९५१ मध्ये दिंडोरी (४९.८५%) व मालेगाव (४९.०४%) तालुक्यात लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक दिसून येतो तर सर्वात कमी लोकसंख्या वाढीचा वेग येवला(१७.०४%) तालुक्यात होता. १९६१ मध्ये निफाड(४१.६३%) व मालेगाव (३६.१०%) सर्वाधिक होता तर सर्वात कमी चांदवड(२०.६१%) तालुक्यात होता.१९७१ ते २००१ या कालावधीत नाशिक तालुक्यात लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक असल्याचे दिसून येते.तो अनुक्रमे ४७.५२%, ३५.०८%, ५५.४८%, व३३.२९% वाढलेली दिसून येते.१९८१ मध्ये पेठ तालुक्याची लोकसंख्या नकारात्मक वाढलेली दिसून येते.२००१मध्ये देवळा तालुक्यातील (११.१५%) सर्वात कमी लोकसंख्या वाढ झालेली दिसून येते

## निष्कर्ष:

नाशिक जिल्ह्यातील १९५१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करता असे दिसून येते कि १९५१ ते १९८१ या कालावधीत जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर कमी झालेला दिसून येतो पण १९९१ मध्ये लोकसंख्या वाढीचा दर वाढलेला दिसून येतो तर २००१ मध्ये पुन्हा त्यात घट झालेली दिसून येते. तालुकानिहाय लोकसंख्या वाढीचा दर अभ्यासता असे दिसून येते कि १९५१ व १९६१ या कालावधीत मालेगाव तालुक्यात लोकसंख्या वाढीचा दर सर्वाधिक होता याचे महत्वाचे कारण म्हणजे मालेगाव तालुक्यात साक्षरतेचे कमी प्रमाण, आरोग्याच्या सोयीचा अभाव हे दिसून येते. १९७१ पासून २०११ पर्यंत नाशिक तालुक्यात लोक्संख्या वाढीचा दर सर्वाधिक आढळून आल्याचे दिसून येते. या कालावधीत नाशिक शहराचा झपाट्याने झालेला विस्तार,उद्योगधंद्यात झालेली वेगाने वाढ व रोजगाराच्या संधी उपलब्द झाल्याने मोठा प्रमाणात बाहेरून प्रदेशातून नाशिक शहरात झालेल्या स्थलांतर यामळे लोकसंख्या वाढलेली दिसून येते.१९५१ मध्ये येवला तालुक्याचा लोकसंख्या वाढीचा दर सर्वात कमी आढळून येतो.१९८१ ते १९९१ या कालावधीत पेठ तालुक्याचा लोकसंख्या वाढीचा दर नकारात्मक आढळून येतो.पेठ,सुरगाणा,कळवण,इगतपुरी ,दिंडोरी व त्र्यंबकेश्वर या आदिवासी तालुक्यात १९५१ ते २००१ या कालावधीत लोकसंख्या वाढीचा दर कमी होताना दिसतो पण इतर तालुक्याच्या तुलनेत लोकसंख्या वृद्धी दर मंद गतीने कमी होताना दिसतो.थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीवर शिक्षण,आरोग्य,शेती विकास,औद्योगिक विकास,स्थलांतर,पायाभूत सोयी

सुविधा या सारख्या घटकांचा प्रभाव पडल्याने तालुक्यानिहाय असमान लोकसंख्या वाढ दिसून येतो .

**संदर्भ-**


1. Husain, M. (2005). Population Geography. Ravat Publication and Jaipur James, M. (2003).
2. An Introduction to Human Geography. Pearson education
3. Chandna, R. C. (1973) : Change in Rural Sex Ratio of Rohtak and Gurgaon District, 1951-61, Jour. OfGeography, Vol. 4.
4. G. T. Trewartha (1969): 'A Geography of Population, World Pattern', John Willey, New York.
5. Ghosh, B. N. (1985), " Fundamentals of Population Geography", Sterling Publisher New Delhi, P. 156
6. Socio-economic abstract of the Nashik District 1950-51,1960-61,1970-71,1980-81,1990-91,2000-01.
7. Government of Maharashtra- Gazetteer of Nashik district
8. Nashik district population census 2011